पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक : २४/११/२०१७

पुणे महानगरपालिका
✷ सूचना ✷
(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील
नियम क्रं.१(डी) (एच) व (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक – २१**

**(खास सभा)**

**मा.राजेश बराटे , मा. सुनील कांबळे, मा. सौ. निलीमा खाडे, मा. सौ. मंजूषा नागपुरे , मा.अविनाश बागवे , मा.मारूती तुपे , व मा. योगेश समेळ या स्थायी समितीच्या ७ ( सात ) मा.सभासदांकडून दिनांक २४/११/२०१७ रोजी लेखी मागणी ( रिक्वीझिशन ) आल्यावरुन पुणे महानगरपालिकेची विशेष (खास ) सभा गुरूवार, दिनांक ३०/११/२०१७ रोजी दुपारी ०३=०० ( तीन ) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात) भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्र.६६६**

संदर्भ:– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/२८३ दि.१८/८/२०१७ चे पत्र.
२) मा.जयंत भावे व मा.सौ.मनिषा लडकत यांची दि.६/११/२०१७ ची उपसूचना
३) मा.सौ.मनिषा कदम व मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांची दि.६/११/२०१७ ची उपसूचना.
४) विधी समिती ठराव क्र. २७ दि. ६/११/२०१७
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१३४४, दि.२१/११/२०१७

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस तसेच विधी समितीची शिफारस विचारात घेऊन –

मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या पुणे महानगरपालिकेचे सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य उपविधी २०१७ यास खालील दुरुस्त्यांसह मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**उपसूचना क्र.१**

ज्या गृहरचना संस्था,सोसायटी,अपार्टमेंट त्यांच्या आवारात निर्माण होणारा त्यांच्या उद्यानातील कचरा (गार्डन वेस्ट) त्या त्या संस्था,सोसायटी,अपार्टमेंटच्या आवारात एकत्र करून ठेवत असतील तर तो कचरा विनामुल्य उचलण्याची व्यवस्था महानरगरनपालिकेकडून करण्यात यावी.

**उपसूचना क्र.२**

प्रकरण १२ जैव –वैद्यकिय कचरा

**(३०)** जैव –वैद्यकिय कचरा व्यवस्थापन

**(१–ग)** मधील जनावरांचे घर हा शब्द वगळण्यात यावा(मराठी उपविधी पुस्तकातील पृष्ठ क्र.६२

**३०–१(च)** (मराठी उपविधी पुस्तकातील पृष्ठ क्र.६२वरील सुचनेऐवजी खालील सुचनेचा अंतर्भाव करावा.
सा.जै.क.प्र.सु.म्हणजे सामाईक जैव वैद्यकिय कचरा प्रक्रिया सुविधा जी,पुणे मनपाने जैव वैद्यकिय कचरा संकलन,वाहतूक,साठा,उपचार प्रक्रिया ,विल्हेवाट आणि हाताळणी करणेसाठी पुणे शहराच्या भौगोलिक कार्यक्षेत्रासाठी,नेमणूक केलेली सुविधा

**३०–(२)** (मराठी उपविधी पुस्तकातील पृष्ठ क्र.६३वरील सुचनेऐवजी खालील सुचनेचा अंतर्भाव करावा.

**(ग) १** मुंबई शुश्रुषा गृहे अधिनियम १९४९ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र,दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी, सा.जै.क.प्र.सु.रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट,महाराष्ट्र मेडिकल कौन्सील, महाराष्ट्र कौन्सील ऑफ इंडियन मेडिसीन , ,महाराष्ट्र कौन्सील ऑफ होमिओपॅथी, ,महाराष्ट्र डेंटल कौन्सील, ,महाराष्ट्र व्हेटर्नरी कौन्सील इ.च्या नुतनीकरणाच्या तसेच शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.

**३०–(२)** (मराठी उपविधी पुस्तकातील पृष्ठ क्र.६३वरील सुचनेऐवजी खालील सुचनेचा अंतर्भाव करावा.

**(झ) ३** मुंबई शुश्रुषा गृहे अधिनियम १९४९ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र,दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी, सा.जै.क.प्र.सु.रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट,महाराष्ट्र मेडिकल कौन्सील, महाराष्ट्र कौन्सील ऑफ

इंडियन मेडिसीन , ,महाराष्ट्र कौन्सील ऑफ होमिओपॅथी, ,महाराष्ट्र डेंटल कौन्सील, ,महाराष्ट्र व्हेटर्नरी कौन्सील इ.च्या नुतनीकरणाच्या तसेच शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.

इंग्रजी उपविधी मधील मुद्दा क्र.३०(४)(बी) मराठीमधील पृष्ठ ६५,मुद्दा–११–ख वरील सुचनेऐवजी खालील सुचनेचा अंतर्भाव करावा.

जैव वैद्यकिय कचरा सुरक्षित संकलन,वाहतूक,साठा, प्रक्रिया ,विल्हेवाट, हाताळणी यासाठी पुणे शहराच्या भौगोलिक कार्यक्षेत्रासाठी जैव वैद्यकिय घनकचरा निर्मूलन नियमावली २०१६,आणि केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने सन २०१६ साली जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक तत्वांना अनुसरून ,तसेच याबाबत लागू असलेले अधिनियम,नियम आणि मार्गदर्शक तत्वानुसार मान्य होतील इतक्या संख्येने सा.जै.क.प्र.सु. स्थापित करणे.

**नविन सूचना** पुणे शहराच्या भौगोलिक कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेले व भविष्यात नव्याने उघडण्यात येणारे दवाखाने,रुग्णालये,रक्तपेढ्या,प्रयोगशाळा इत्यादी यांनी पुणे म.न.पा.कडे जैव वैद्यकिय कचरा सुरक्षित संकलन,वाहतूक,साठा, प्रक्रिया ,विल्हेवाट, हाताळणी यासाठी नोंदणी करणे बंधनकारक आहे.

<u>विषय क्र.६६७</u>

संदर्भ:– १) टेंडर क्र. १०३–२०१४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७०७ दि. २/१२/२०१५
३) Innovative Transport Solutions Pvt.Ltd. (ITrans) यांना दिलेले जा.क्र.पथ/१२७ दि. ३/१२/२०१५ ची वर्कऑर्डर
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/५३३ दि.१६/११/२०१७ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१३४५, दि.२१/११/२०१७

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे शहरातील शहरी वाहतूक नियोजन यांचे सहाय्याने Non Motorized Transport (NMT) अंतर्गत तयार केलेल्या पुणे शहरातील एकात्मिक सायकल आराखड्यास (Comprehensive Bicycle Plan) तसेच या आराखड्यातील तरतुदीच्या अनुषंगाने पुणे पब्लिक बायसिकल शेअर सिस्टीम (PBS) राबविणेसाठी तयार केलेल्या धोरणास व त्या संबंधी करावयाच्या समजुतीचा मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेला करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे महानगरपालिकेने तज्ञ सल्लागारांमार्फत तयार केलेल्या एकात्मिक सायकल आराखड्यास
२) सदर सायकल आराखड्यातील बाबींचे विकसनाकरिता किमान सलग ३ वर्षे पुरेशी आर्थिक अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध होणेस
३) सदर आराखड्यात दर्शविलेले सर्व सायकल मार्ग पुणे मनपाचे विकास आराखड् यात आवश्यकतेनुसार समाविष्ट करणेस
४) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलल्या पुणे पब्लिक बायसिकल शेअर (PBS) सिस्टीमच्या धोरणास
५) सदर धोरणानुसार संबंधित संस्था/चालक यांचेशी करावयाच्या समजुतीच्या करारनाम्यास व त्यानुसार त्यांचेशी पुणे महानगरपालिकेतर्फे मा.महापालिका आयुक्त यांनी समजुतीचा करारनामा करणेस

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– २४/११/२०१७.

**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**